**<u>नि.फौ.ख.क्र.८३/२०१६</u>**
शासन–वि– अमित जगताप
**<u>नि.क्र.५७</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | शिवदास माणिक फुंदे, |
| वय | – | ६८ वर्षे, |
| व्यवसाय | – | सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, |
| राहणार | – | रायगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर. |

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. २००५ ते २०१२ पर्यंत मी यवत पोलीस स्टेशन येथे हवालदार आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणुन कार्यरत होतो. दि. २९.०५.२०१२ रोजी ज्ञानदेव शिवाजी बागडे यांची फसवणूक झाल्याबाबत ते तक्रार देण्यासाठी आले होते. त्यांची तक्रार मी स्वतः नोंदवून घेतली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार अमित जगताप याने त्यांना फसविले होते. आता मला दाखविण्यात आलेले तक्रार नि. ४४ वर तीच आहे. त्यावर माझी, फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. आता मला दाखविण्यात आलेले छापील प्रथम खबर नि. ४५ वर तीच आहे. त्यावर माझी, फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानुसार गु.र.क्र.१२२/२०१२ भा.दं.वि. का. कलम ४२०, ४०६, ५०४, ५०६ अन्वये नोंदवून त्याचे तपासकाम माझ्याकडे देण्यात आले. तपासकामात घटनास्थळ पंचनामा दि. ३०.०५.२०१२ रोजी दोन पंचांसामक्ष तयार केला. घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले होते. घटनास्थळ हे सहजपुर, महालक्ष्मी बँक येथे होते. आता मला दाखविण्यात आलेला नि. ६० वरील घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर १७ ते १८ साक्षीदार निष्पन्न करुन त्यांचे तपास टिपण नोंदविले. तसेच चेक आणि चेक बाउंन्स झालेल्या पावत्या हस्तगत करुन तपासकामात समाविष्ट करुन घेतले. त्यानंतर पुढील तपासकाम एएसआय मोरे यांच्याकडे सोपविण्यात आला. आरोपीला पहिल्यापासून ओळखत असल्यामुळे त्याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने आरोपीला ओळखलेले आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे त्याचे विद्वान विधीज्ञ श्री. आर. पी. जाधव यांच्यामार्फत.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी अनेक प्रकरणांमध्ये तपासी अंमलदार म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि फिर्यादी एकाच गावचे रहिवासी असल्यामुळे एकमेकांना ओळखत होते. हे म्हणणे खरे आहे की, यवत पोलीस स्टेशनला सात वर्षे कार्यरत असल्यामुळे मीदेखील आरोपीला आधीपासून ओळखत होतो. हे म्हणणे खरे नाही की, वादातील फिर्याद दाखल करण्यापूर्वीपासून पाच ते सहा वर्षे आरोपी शेअर मार्केटमध्ये काम करत होता. हे म्हणणे खरे नाही की, या केसमधील फिर्यादी आणि साक्षीदार व्यतिरिक्त गावातील इतरांनी व आसपासच्या गावातील लोकांनीदेखील आरोपीकडे शेअरमार्केटमध्ये गुंतविण्याकरिता पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने फिर्यादी व साक्षीदारांना सुरुवातीला शेअर मार्केटमधून मिळणारा परतावा दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, समाजात बरेचसे लोक शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करत असतात. हे म्हणणे खरे आहे की, शेअर मार्केटमधून मिळणारा परतावा हा मार्केटच्या चढउतारावर अवलंबून असतो. हे म्हणणे खरे आहे की, शेअर मार्केटमधून मिळणारा परतावा हा फिक्स किंवा टक्केवारीवर अवलंबून नसतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येकजण शेअर मार्केटमध्ये स्वतःच्या जबाबदारीवर आणि आर्थिक फायद्याकरिता गुंतवत असतो. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी डीमॅट अकाउंटची गरज भासते याची मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने लोकांकडून स्वीकारलेली रक्कम स्वतःकडे ठेवली अथवा शेअरमार्केटमध्ये गुंतवली याबाबत मी तपासकाम केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या बँक खात्यांबाबत मी कोणताही तपासकाम केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने आणि साक्षीदाराने आरोपीला पैसे दिल्याबाबत त्यांच्याकडून कागदोपत्री पुरावा हस्तगत केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने काही काळ फिर्यादी व साक्षीदारांना त्यांच्या रकमेवरील परतावा अदा केला नाही म्हणून वादातील फिर्याद देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने आरोपीला पैसे दिल्यानंतर १६ ते १७ महिन्याच्या कालावधीनंतर वादातील फिर्याद दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या १६ ते १७ महिन्याच्या कालावधीत फिर्यादीने आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार पोलीस स्टेशनला अथवा न्यायालयात केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने आणि साक्षीदाराने आरोपीने त्यांना दिलेल्या धनादेशाचे झेरॉक्स प्रती मला दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्या धनादेशांचे मूळ प्रती आजतागायत माझ्याकडे फिर्यादीकडून प्राप्त झालेला नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद दाखल झाल्यानंतर पंचनामा दुस–या दिवशी केला होता. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा करायला जातेवेळी स्टेशन डायरीला नोंद केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी आणि साक्षीदाराने त्यांच्या आर्थिक फायद्याकरीता स्वतःच्या मर्जीने आरोपीकडे गुंतवणूक करण्याकरिता दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादी आणि साक्षीदारांची फसवणूक केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटया फिर्यादीवरुन कोणताही तपासकाम न करता

आरोपीविरुध्द कोणताही पुरावा नसताना खोटे दोषारोपपत्र दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.                                        समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- १७.०४.२०२६                    न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.